# अभ्यंगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्याबाबत

मार्च ११, २०२२

**प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६ /प्र.क्र.( २०४/१६) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३.११.२०१६.

**परिपत्रक:-**

राज्य माहिती आयोग, कोकण यांच्याकडे दाखल असलेल्या व्दितीय अपील क्र.केआर-४५२८/२०१५ वर निर्णय देताना, "प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्यात यावेत, सदर फॉर्म ई-मेल व्दारे सेवा पुरविणाऱ्या नोडल प्राधिकरण/पर्यवेक्षकाकडेही पाठविण्यात येतील. सदर अभिप्रायाचे फॉर्म प्रत्येक तिमाहीला संबंधीत अधिकाऱ्यासमोर उघड करण्यात यावेत आणि सदर अधिकाऱ्याची जनतेबरोबरची वागणूकीबाबत त्याच्या गोपनीय अहवालात मुल्यमापन करण्यासाठी वापरण्यात यावेत" असे आदेश माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(अ) अन्वये मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांनी दिले आहेत.सदर आदेशाची पूर्तता करणे आवश्यक आहे. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर आदेशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. "प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्यात यावेत, सदर फॉर्म ई-मेल व्दारे सेवा पुरविणाऱ्या नोडल प्राधिकरण/पर्यवेक्षकाकडेही पाठविण्यात यावेत. सदर अभिप्रायाचे फॉर्म प्रत्येक तिमाहीला संबंधित अधिकाऱ्यासमोर उघड करण्यात यावेत आणि सदर अधिकाऱ्याच्या जनतेबरोबरच्या वागणुकीनुषंगाने त्याच्या गोपनीय अहवालात मुल्यमापन करण्यासाठी वापरण्यात यावेत".

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१६११२३१६२५५३५८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

(रा.मा.जाधव)
शासनाचे उप सचिव.

प्रति,
१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.